जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
28 JAN 2018
महाराष्ट्र टाईम्स

# राज्यात आज सेट परीक्षा



**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे महाराष्ट्र व गोवा येथील विद्यार्थ्यांसाठी घेण्यात येणारी राज्यस्तरीय पात्रता परीक्षा (सेट) आज रविवारी २८ जानेवारी रोजी होणार आहे. सहायक प्राध्यापक होण्यासाठी ही परीक्षा उत्तीर्ण करावी लागते. या परीक्षेला दोन्ही राज्यातील मिळून ७८ हजार ३३० विद्यार्थी बसणार आहेत. राज्यातील एकूण १५४ केंद्रावर ही परीक्षा होणार आहे. विद्यापीठाच्या सेट विभागाकडून परीक्षेचे आयोजन करण्यात आले आहे.

या परीक्षेसाठी दोन्ही राज्यातून सुमारे ८४ हजार विद्यार्थ्यांनी परीक्षेसाठी ऑनलाइन अर्ज केले होते. त्यातील ७८ हजार ३३० विद्यार्थ्यांनी वेळेत शुल्क भरून अर्जाची प्रक्रिया पूर्ण केली आहे. विद्यार्थ्यांना प्रवेशपत्र विद्यापीठाच्या वेबसाइटवर उपलब्ध करून देण्यात आले आहे. परीक्षा सुरू होण्यापुर्वी एक तासापूर्वी विद्यार्थ्यांनी परीक्षा केंद्रावर उपस्थित राहणे बंधनकारक आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना सकाळी ९ वाजता परीक्षा केंद्रावर उपस्थित राहावे लागणार आहे. परीक्षेचे पहिले सत्र सकाळी १० ते ११.१५, तर दुसरे सत्र ११.४५ ते २ होणार असून, तिसरे सत्र २.३० ते ५.३० या वेळेत होणार आहे.